**जीवनावश्यक शेतमालाचे खरेदी विक्री व्यवहार सुरु ठेवण्यासाठी बाजार समित्यांनी करावयाची कार्यवाही.**


पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
नविन मध्यवर्ती इमारत, ३ रा मजला, पुणे
Ph No- ०२०- २६१२६६२८/२६१२३९८५
Gmail- dirmktms@gmail.com Website- mahapanan.maharashtra.gov.in


---

जा.क्र.पणन-५/ परिपत्रक / सन २०२० दिनांक:- २३ /०३/ २०२० /१०२१

## परिपत्रक

कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत या कार्यालयाने जा.क्र. पणन-५/ परिपत्रक/ सन २०२० दि.१६.०३.२०२० अन्वये सुचना निर्गमित केल्या आहेत. तसेच जीवनावश्यक वस्तुचा पुरवठा सुरळीत राहण्याचे दृष्टीने या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.पणन-५/ परिपत्रक / सन २०२० दिनांक:- १९ /०३/ २०२० अन्वये कृषि उत्पन बाजार समित्यांमधील शेतमालाचे व्यवहार सुरु ठेवणेबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि मुंबई, पुणे येथील काही व्यापारी संघटनांनी कामकाज बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते. तसेच इतरत्रही असे होण्याची शक्यता नाकारता येत नाही .

त्याअनुषंगाने सर्व बाजार समित्यांना कळविण्यात येते की, कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन बाजार आवारातील अनावश्यक गर्दी कमी करणेबाबत या कार्यालयाने जा.क्र. पणन-५/ परिपत्रक / सन २०२० दिनांक:- २३ /०३/ २०२० अन्वये आवश्यक त्या सुचना निर्गमित केल्या आहेत. बाजार समितीमध्ये शेतमाल खरेदी विक्रीचे व्यवहार न करण्याबाबत काही बाजार घटकांनी भुमिका घेतली असल्यास, त्यांना जीवनावश्यक शेतमालाचा पुरवठा सुरळीत राहील या दृष्टीने उचित दक्षता घेवून सदरचे बाजार सुरु ठेवणेबाबत त्यांचेशी चर्चा करण्यात यावी व बाजार सुरु राहतील असे पहावे.

तथापि, **बाजार समित्यांनी उपरोक्त प्रमाणे प्रयत्न करुनही बाजार घटकांनी कामकाज सुरु न ठेवल्यास, बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आवक झालेला शेतमाल आणि घाऊक खरेदीदार यांचा समन्वय करुन शेतमालाची खरेदी विक्री सुरु राहील यासाठी बाजार समितीने समन्वयक म्हणून कामकाज करावे आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात याव्यात.**

सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनीही त्यांचे जिल्हयातील सर्व बाजार समित्यांमध्ये जीवनावश्यक शेतमालाचे खरेदी विक्रीचे कामकाज सुरळीत चालू राहील आणि पुरवठा सुरळीत राहील यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही त्यांचे स्तरावर करावी.

**(सुनिल पवार)**
**पणन संचालक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत : आवश्यक त्या कार्यवाहीसाठी .**

१. सभापती/ सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व )
३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व )